<u>राज्य योजना सन २०१९-२०२०</u>
महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाची स्थापना (२४०६ ८६९६) चालू बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांकः डब्ल्यूएलपी-०५.१९/प्र.क्र. १३८ /फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०४ मे, २०१९

<u>वाचा</u> :-

१. वित्त विभागाचे, शासन परिपत्रक, क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.०७/९९/१९-२०, दिनांक :- ३०.०४.२०१९.

<u>प्रस्तावना</u> :-

सन २०१९-२०२० मध्ये राज्यस्तरीय योजनेतंर्गत महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाची स्थापना (२४०६ ८६९६) या लेखाशिर्षांतर्गत रुपये ३००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

२. संदर्भिय वित्त विभागाच्या परिपत्रकात **“सन २०१९-२०२० या वर्षाकरीता प्रस्तावित केलेल्या विनियोजनांची अनुसूच या अर्थसंकल्पीय प्रकाशनातील “स्तंभ क्रमांक ५ व ६” यामध्ये विभागांना दर्शविलेल्या रकमांचे अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (BEAMS) वाटप करण्यात येत असून सदर तरतूदींची एप्रिल ते जुलै, २०१९ पर्यतची मासिक निधी विवरणपत्रे अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) प्रशासकीय विभागाकडून नोंदविण्यात आल्यांनतर विभागास आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमावरील खर्चाचा निधी (लेखानुदान) वितरीत केला जाईल. त्याचे तात्काळ वाटप करावे.”** असे नमूद करण्यात आले आहे.

३. संदर्भ क्रमांक १ च्या परिपत्रकात नमूद केल्याप्रामाणे महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाची स्थापना (२४०६ ८६९६) या लेखाशिर्षाअंतर्गत अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) वर रु. ९९.९९ लक्ष निधी माहे एप्रिल ते जुलै, २०१९ पर्यत वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये सन २०१९-२०२०) करीता महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाची स्थापना (२४०६ ८६९६) या योजनेतर्गत रु.३००.०० लक्षचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे. त्या अनुषंगाने शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सादर केलेले प्रस्ताव व महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाची स्थापना (२४०६ ८६९६) या योजने अंतर्गत उपलब्ध निधीच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधीन राहून **रुपये ९९.९९ लक्षच्या प्रस्तावास** शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

I. प्रस्तावीत खर्च:- लेखाशिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, १०१ (११) वनसंरक्षण, विकास व पुर्ननिर्मिती पंचवार्षिक योजना अंतर्गत राज्य योजना)११) (३६) महाराष्ट्र राज्य, जैवविविधता मंडळ)२४०६-८६९६ (या लेखाशिर्षाखाली सन २०१८१-९ मध्ये अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध होणाया- अनुदानातून खर्च करण्यात यावा.

II. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाची स्थापना (२४०६ ८६९६) या योजनेच्या व्याप्तीमध्ये येत असल्याची खातरजमा करूनच वितरीत करावा.

III. योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.

IV. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

V. सदरच्या खर्चाच्या अनुषंगाने आवश्यक असलेले लेखे व्यवस्थित/अचूक ठेवण्याबाबत दक्षता घ्यावी.

VI. कार्यबाबींमध्ये खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यात यावी.

VII. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक :- १७.०४.२०१५, क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ च्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०४१५००२७२४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJAY DEORAO DODAL

Digitally signed by SUJAY DEORAO DODAL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf,
postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=a6a471816b9dbfd727f2e5ec4825f4678c8393d846acd1c16b8936c8b3a519c6,
ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SUJAY DEORAO DODAL
Date: 2019.05.04 15:05:25 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर.
५. महालेखापाल१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षण), मुंबई/नागपूर.
६. ब-१, फ-२,फ-१ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.